Estd.:1962
N.A.A.C.- A Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

**विषय :-** Annual PBAS च्या सुधारीत नमुन्यांबाबत.

संदर्भ :- या विभागाचे परिपत्रक कमांक एसयु/आस्थापना/पी.जी/1109 दि.30/09/2019.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि. 30 जून 2010 च्या युजीसी अधिसूचनेद्वारे विद्यापीठातील शिक्षकांना नविन शैक्षणिक अर्हता लागू केल्या होत्या. सदर अर्हतांमध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाने कं F.1-2/2016(PS Amendment) दि.11जुलै 2016 च्या युजीसी अधिसूचनेद्वारे चौथी सुधारणा केली असुन सदर अधिसुचनेमध्ये शिक्षक यांना PBAS व CAS साठी नविन शैक्षणिक अर्हता दिलेल्या आहेत. सदर युजीसी अधिसूचना महाराष्ट्र शासनाने कं. संकीर्ण–2017/प्र.क. 33117 विशि–1 दि.4 मार्च. 2017 च्या शासन निर्णयाने लागू केली आहे.

सदर युजीसी अधिसूचने मधील तरतुदीनुसार PBAS Proforma for Promotion under CAS व Annual Self-assessment for the performance Based Appraisal System (PBAS) चे सुधारित नमुने (Proformas) तयार करुन घेण्यात आले होते. त्यास विद्यापीठ अधिकार मंडळाने मान्यता दिली असुन ते या विभागाच्या परिपत्रक कमांक एसयु/आस्थापना /पी.जी/4012 दि. 21/12/2017 द्वारे लागु करण्यात आले होते .

तद्नंतर विद्यापीठ अधिकार मंडळाने सदर नमुन्यांमध्ये सुधारणा केलेली आहे. तेव्हा सन 2017–18 व 2018–19 या वर्षाचे स्वयंमुल्यमापन अहवाल Annual Self-assessment for the performance Based Appraisal System (PBAS) सादर करताना या नमुन्यांमध्ये भरुन कार्यालयास सादर करण्याबाबत या विभागाच्या परिपत्रक कमांक एसयु/आस्थापना/पी.जी/1109 दि.30/09/2019 द्वारे कळविण्यात आले होते. परंतु अद्याप काही शिक्षकांनी सदर Annual Self-assessment for the performance Based Appraisal System (PBAS) कार्यालयात जमा केलेले नाहित.शासन निर्णय कमांक 1013/प्र.क.55/कोषा प्र –5 दिनांक 12 सप्टेंबर,2013 नुसार प्रत्येक शैक्षणिक वर्षाचे स्वयंमुल्यमापन अहवाल दि.30जून पर्यंत सादर करणे आवश्यक आहे. तसे न झाल्यास त्या वर्षातील दिनांक 1 जुलै रोजी देय होणारी वार्षिक वेतनवाढ निर्गमित/अदा करता येणार नाही. तरी सदर Annual Self-assessment for the performance Based Appraisal System (PBAS) कार्यालयात दि.10/6/2020 पर्यंत हार्ड व सॉफ्ट कॉपी (पी.डी.एफ.) मधुन जमा करण्यात यावेत.

कं. एसयु/आस्थापना/पीजी/387

दिनांक : - 5 JUN 2020

कुलसचिव
(डॉ.व्ही.डी.नांदवडेकर )

प्रतः–

सर्व अधिविभागप्रमुख , संचालक,समन्वयक,
पदव्युत्तर अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

–सदरचे परिपत्रक सर्व संबधित शिक्षकांच्या निदर्शनास आणावे.